# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक क्र. ६१/२०२३**

**''भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना''**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागून आर्थिक अडचणींचा सामना न करता पीएच्. डी. संशोधन करण्याची संधी प्राप्त होवून त्यातून राष्ट्रपयोगी दर्जेदार संशोधन विद्यार्थ्यांकडून घडावे या हेतूने विद्यापीठ विभागात नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्याकरीता सन २०१८ पासून **''भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना''** खालीलप्रमाणे विहित केलेल्या नियम व अटीनुसार लागू करण्यात आलेली आहे.

सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यापीठ शैक्षणिक विभागात व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रावरील पीएच्. डी. प्रवेशप्रक्रिया २०१९ पूर्ण करुन शैक्षणिक वर्ष २०१९—२० मध्ये दि. ०१/०८/२०१९ ते ३०/०८/२०२१ या कालावधीमध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमास नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन (online) पध्दतीने **दिनांक २०/०५/२०२३** पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे.

<u>**शिष्यवृत्ती योजनेसाठीच्या नियम व अटी**</u>

१ सदर योजना विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागात पीएच्.डी. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१९—२० मध्ये नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांपैकी योजनेस पात्र असणाऱ्या १०० गुणवंत संशोधक विद्यार्थ्यांना दि. ०१/०७/२०१९ पासून अथवा त्यांच्या प्रवेश दिनांकापासून जास्तीत जास्त ०२ वर्ष कालावधीसाठी रू. ८०००/— प्रतिमहा दराने विहित केलेल्या नियम व अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून लागू करण्यात येईल.

२ ''भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना'' महाविद्यालयात पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१९—२० मध्ये नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांपैकी योजनेस पात्र असणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयातील एका विद्यार्थ्यास त्याचा प्रवेश झालेल्या दिनांकापासून जास्तीत जास्त ०२ वर्ष कालावधीसाठी रू. ६०००/— प्रतिमहा दराने विहित केलेल्या नियम व अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून लागू करण्यात येईल.

३ किमान ५ वर्ष व त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत असणाऱ्या संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रातील पीएच. डी. विद्यार्थ्यांनाच केवळ सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करता येतील.

४ सदर शिष्यवृत्ती योजना सुरूवातीस एक वर्ष कालावधीसाठी लागू करून वर्षाअखेर विहित पध्दतीने आढावा घेवून पुढील एक वर्षासाठी योजनेस मुदतवाढ देण्यात येईल.

५ पीएच.डी. अभ्यासक्रम अपुर्ण ठेवल्यास अथवा अभ्यासक्रम पूर्ण करताना इतरत्र पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ नोकरी केल्यास शिष्यवृत्तीची दिलेली रक्कम विद्यार्थ्यास विद्यापीठाकडे परत जमा करावी लागेल.

६ सदर शिष्यवृत्ती योजना लागू असलेल्या विद्यार्थ्यांना अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

७ विद्यार्थ्याने पीएच्.डी. अभ्यासक्रमा व्यतिरिक्त इतर कोणत्याही दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.

८ प्रत्येक विद्यार्थ्याची हजेरी त्या त्या महिन्यात ७५ टक्के असणे आवश्यक असून विद्यार्थ्याची हजेरी बायोमॅट्रीक पध्दतीने, मार्गदर्शक व संबंधित विभागप्रमुखांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

९ सदर योजना लागू असलेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी लागू असलेले इतर सर्व नियम व अटी बंधनकारक राहतील.

१० सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पीएच्.डी.च्या संपुर्ण कालावधीत आपल्या संशोधनाशी निगडीत दोन कार्यशाळेत/परिषदेत सहभाग घेवून शोधनिबंधांचे सादरीकरण करणे आवश्यक असुन तसे प्रमाणपत्र सादर करणे व Refereed Journals मध्ये किमान एक संशोधन लेख (Research Paper) प्रसिद्ध करणे बंधनकारक राहील.

११ सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दर सहा महिन्याने प्रगती अहवाल (Progress Report) विहित केलेल्या Research Advisory Committee मार्फत सादर करणे बंधनकारक राहील.

१२ फिल्ड वर्क मध्ये केलेले कामकाज मार्गदर्शकाने तपासणे आवश्यक आहे. फिल्डवर्कसाठीच्या रजेचा कालावधी प्रथम मार्गदर्शक व विभागप्रमुख यांच्याकडून मान्य करून घेणे आवश्यक राहिल, तद्नंतरच सदर कालावधी शिष्यवृत्तीसाठी ग्राहय धरण्यात येईल. अभ्यासक्रमास नोंदणी मान्यतेचे पत्र शिष्यवृत्तीसाठी सादर करणे आवश्यक राहील.

१३ सदर योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ते नोकरी करत नसल्याबाबतचे हमीपत्र संशोधक, मार्गदर्शक व संबंधित विभागप्रमुख/ मा. प्राचार्य संबंधित संशोधन केंद्र यांच्या स्वाक्षरीसह देणे बंधनकारक राहील.

१४ निवड प्रक्रिया:

विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज व संशोधन करीत असलेल्या विषयावरील संक्षिप्त प्रस्ताव मागवून मा. कुलगुरू यांनी गठित केलेल्या निवड समितीद्वारे विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करून मुलाखत घेतल्यानंतर पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. चार विद्याशाखांमध्ये सदर १०० शिष्यवृत्तींची विभागणी प्राप्त झालेल्या एकूण पात्र अर्जापैकी त्या त्या विद्याशाखेच्या अर्जांच्या प्रमाणात करण्यात येईल.

१५ महाराष्ट्र शासनाने आरक्षणासंदर्भात विहित केलेले प्रचलित नियम सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी लागू राहतील.

**"भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना"** या शिष्यवृत्ती योजनेससाठी पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या http://bcud.unipune.ac.in या लिंकवर Ph.D. Tracking या लिंकवर क्लिक करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावेत. सदर लिंक **दि. २५/०४/२०२३ पासून दि. २०/०५/२०२३** पर्यत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत खाली नमूद केलेल्या कागदपत्रासह, तसेच मार्गदर्शक व विभागप्रमुख यांच्या शिफारशीसह **दिनांक ३०/०५/२०२३** पर्यत शैक्षणिक प्रवेश विभागात प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावेत.

**आवश्यक कागदपत्रे :—**

**१. पदवी/पदव्युत्तर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत** (Marks Statement of Master Degree.)

**२. पीएच.डी. प्रवेशपत्र** (Provisional/Confirmation Admission Letter.)

**३. हमीपत्र** (Undertaking on Plain Paper.)

**४. संशोधनाबाबतचा संक्षिप्त गोषवारा.** (Brief proposal of Topic Research.)

उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ }
संदर्भ क्र.: शै. प्रवेश/१९८५ }
दिनांक : २४/०४/२०२३ }

प्रत :— माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग/ मा. प्राचार्य/ मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

**भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना.**

1. या वेबसाइट वरती क्लिक करा: http://unipune.ac.in , त्यानंतर **BOD Online** या पोर्टल ला क्लिक करा.

2. विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या पर्यायांन पैकी **PhD/MPhil Tracking** हा पर्याय निवडा.

3. तुमचा नोंदणीकृत **Username** आणि **Password** टाकून **Login** करा.

4. तुमच्या Dashboard मेनू मध्ये तुम्हाला JRD Tata Scholarship Status असं दिसेल, त्या खाली तुम्हाला Do you want to apply for JRD Tata Scholarship? असं विचारेल, Yes हा पर्याय निवडा.

5. भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज भरण्यापूर्वी खालील माहिती भरणे आवश्यक आहे.
    a. वैयक्तिक तपशील फोटो आणि सहीच्या स्कॅन कॉपीसह.
    b. शैक्षणिक माहिती कागदपत्रांसह भरावी.
    c. प्रवेश तपशील (उदा. Provisional Admission Letter / Admission Confirmation Letter/Topic Approval Letter).
    d. संशोधन मार्गदर्शक तपशील.

6. तुम्हाला तुमची सर्व माहिती दिसेल ती माहिती तपासा आणि **Confirm** बटण वर क्लीक करा.

7. त्यानंतर तुमचा अर्ज नोंदणीकृत होईल आणि तुम्हाला ला नोंदणीकृत अर्ज दिसेल.

8. नोंदणी केलेल्या अर्जा समोर **Print** हा पर्याय निवडून तुम्ही भरलेला अर्ज डाउनलोड करू शकता.